REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 10 | JULY - 2025

# कविता महाजन यांच्या ‘धुळीचा आवाज’ मधील कवित्व !

**डॉ. संदीप आत्माराम भेले**
**आदर्श कला, वाणिज्य आणि विज्ञान**
**महाविद्यालय, कुळगाव-बदलापूर, जिल्हा. ठाणे, महाराष्ट्र.**

**सारांश :**




कविता महाजन यांच्या ‘धुळीचा आवाज’ मधील कविता ! हे जीवनातील सारं सांगणार आहे. कवयित्री आपल्या अनुभवातून माणसाचं विश्व उभारताना दिसते. इथल्या कणा कणांचा हिशोब, ज्या मधून व्यथा, वेदना समोर प्रगटल्या आहेत. स्त्रीच्या वाट्याला येणार जीवन, कवितांचं गर्भ साधतो. प्रत्येक कविता मधून एक वेगळा आर्वीभाव जागृत झालेला जाणवतो. ज्यामधून इथल्या समाज रचनेचा श्वास दरवळला आहे. स्त्री जाणीव हीच मूळ आशयातील प्रतिमा कवयित्रींची आहे. ज्याला त्यांनी ‘धूळ’ म्हटलं आहे. स्त्री या समाजातील पिढ्यानुपिढ्या ‘धूळ’ आहे याच धुळीचा आवाज महाजन ह्यांच्या कवितेतील यलगार आहे.

**बीज शब्द :** धूळ, आवाज, प्रतिमा, साहित्य, प्रवाह, दंगल, स्त्री, वेदना, दु:ख, कवित्व, कवयित्री, शैली, धाटणी, अर्थ, इ.

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यामध्ये रंजनवादी परंपरेत अनेक साहित्य लिहिल्या गेले. ज्या मध्ये सामाजिकतेचा अभाव दिसून आला. परंतु स्वातंत्र्यानंतर अनेक चळवळीचा रोष निर्माण झाला. यामध्ये एक चळवळ म्हणजे स्त्रीवादी चळवळ, या चळवळीने स्त्रीया लेखिका वर्तुळात अवतरल्या त्यांनी स्त्रियांचे दु:ख, वेदना साहित्यरुपाने मांडले. ८ मार्च चळवळ जगात गाजली. या चळवळीने ‘जागतिक महिला दिवस’ हा साजरा केला. याचा प्रभाव भारतामधील स्त्री लेखिकांवर पडला. स्त्रियांनी वादी भूमिका घेऊन लेखन केलं. यामध्ये एक नाव म्हणजे कविता महाजन ! अलीकडच्या काळात ज्यांच्या सत्वयुक्त कवितेनं लक्ष वेधून घेतलं त्यात कवयित्री कविता महाजन यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा. भासाचं, अभासाचं, स्वप्नांचं, सुखदु:खाच्या वास्तवाचं अद्भुत द्रव्य शोषून घेत ‘धुळीचाआवाज’ मधील कविता विकसली गेली आहे. आत्मानुभवाचं अपारंपरिक रूप उत्कटपणे कवयित्री प्रकट करताना दिसते. सीमित केंद्रातून मुक्त होत व्यापक पातळीवर महाजन ह्यांची कविता स्त्री, माणूस मनावर रुजताना

दिसते. सामाजिक समस्यांत, स्त्रियांच्या विशेषत: आदिवासी समस्यात त्यांना अधिक स्वारस्य असल्याने त्यांचं काव्य स्त्री जाणिवेतून पुरेपूर उतरले असे जाणवते.

## विषय विवेचन :

'धुळीचा आवाज' या कविता संग्रहातील कवित्व ! प्रामुख्याने कवयित्री कविता महाजन यांच्या विशेष सामाजिक अनुभवातून सक्षम असे झालेले आहे. कवयित्री लढवय्या बाण्याची आहे. तिला हारणं पसंत नाही. उगाच आयुष्याला तंगावं असं त्यांना वाटत नाही. कविता संग्रहातील त्यांची पहिलीच कविता 'पाखरू' ऊर्जायन सिद्ध करताना दिसते. जीवनाला समोर करताना कवयित्री म्हणते,

"फक्त एकदाच हरल्यानंतर
जिंकत राहते आणि पाखरू
आता दरवेळी..."

स्त्री दु:ख आणि वेदना या चौकटीत हिरमुसलेली गुलाब पाकळी आहे. याची जाणीव त्यांना प्रगल्भपणे आहे म्हणून जिंकण्याचा मोह त्यांना आवरत नाही. त्यांची कविता पुरुषांच्या डोळ्याला डोळा भिडवून उभी झालेली आहे.

"की तू समजून शकत नसावास
माझ्या डोळ्यातील उजेड आणि
देहातील अंधार याची जुळवणी...."

अशा ओळीतील मार्मिकता स्त्रीवेदनांचा बुरूज उभारताना दिसते. माणसांच्या अंतरंगाला खुलवत महाजन यांनी आपल्या कवी प्रतिभेचा वणवा पेटवल्याचे लक्षात येते. जगण्याची भयता त्यांच्या कवितेमधून अवतरली आहे. 'दंगल' सारखा प्रकार आज समाजाला कीड घालतोय म्हणून कवितेतून इथले वास्तव रेखाटताना त्यांची अनुभूती पुन्हा पुन्हा खोलवर जाताना दिसते. महाजन यांनी माणसांच्या जीवनात निसर्ग किती महत्त्वपूर्ण आहे याची जाणीव करून दिली आहे.

"एक चित्र मला कधीपासून रंगवायचे आहे
काडेपेटीत ठेवलेल्या फुलपाखराचं."

वरील कवितेची ओढ साधी सरळ असली तरी कवयित्रीतल्या बंदिस्त जीवनाचं चित्रच समोर करून आहेत. फुलपाखरू, पाचोळा अशी दिसणारी चित्रे त्यांनी दु:ख मांडताना समोर केली आहेत असे म्हणता येईल. गर्दीचं जीवन हे कवयित्री कविता महाजन ह्यांचं भावविश्व असल्याचं कळतं कारण त्या शहरांच्या सूक्ष्म छटा काव्यात उत्तुंगपणे भरतात, सोबतच दूर दिसणारा निसर्ग, ऊन, वारा, पाऊस, पानझड हे सारं भोवतालचं जग त्यांच्या काव्यांची परिणीती आहे. त्यांची कविता धावत्या जगाच्या ओघातील विश्व बनलेली दिसते.

आणि शामिल होतो घोघावणाऱ्या दैनंदिन
झुंडीत
प्लॅटफॉर्मवर ओघळून."

कवितेच्या वरील ओळी इथल्या प्रवासमयी जीवनांचा त्यातून ओरघडणाऱ्या व्यथा, वेदनांचा आलेख मांडताना दिसतात. सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर म्हणतात त्याप्रमाणे, "जीवन हा एक अखंड वाहता प्रवाह आहे. कलावंत आपल्या अनुभवांचे भांडे त्या प्रवाहातील पाण्यानेच भरून घेतो."[१]

जीवनातील वास्तवता, रोजनीती नियम ज्याला कुणीच अडवू शकत नाही अशा प्रवाहाची अनुभूती वारंवार कवयित्री महाजन करून देताना दिसतात. रसिकांना, मार्मिकांना कवयित्रीची एक-एक रचना प्रश्नांच्या घोळक्यात घालताना दिसते. 'आता निमूट नजर फिरवून निभाव लागेल?' अशा सारख्या ओळी विचार करायला लावतात. जीवनाच्या खोलवर पातळीत विचार अंतरंगात महाजनांची काव्य दृष्टी उतरलेली आहे.

"कागद जणू पावसात भिजून आहे
असा ओला वाटत होता;
इतका निथळत होता पाऊस
मैत्रिणीच्या चित्रात

एक बाजू बघितली तर सुखाचा ओलावा आणि दुसरी बाजू बघितली तर दु:खाचा गारवा. म्हणूनच कवयित्री महाजन यांची काव्य अनुभूती जीवनाच्या पायथ्याशी घट्ट बांधलेली दिसते. जीवनाच्या बाबतीत चिंतनशीलपणा, विचारताच कवितेन ओतपोतपणे घेरलेलं असल्याचं जाणवते.

"आभाळाची अभिलाषा मनात धरताना
ध्यानात नव्हतं आलं
आपल्याला आभाळासह
स्वीकारण्याइतकी जागा
कुठल्यात घरात नसते."

कवयित्रीच्या वरील ओळी सत्य मांडताना कुठलाही कमीपणा स्वीकारण्यात मान्य करीत नाही. 'सावली' नावाच्या कवितेत म्हणतात,

"सावली
एक नं झाकता येणारा
काळा आरसा !"

कवयित्री अशाप्रकारे बिनधास्त इथले सत्यप्रत्यय मांडतात. खूप काही शिकवून जाणाऱ्या ओळी महाजन ह्यांनी प्रकटल्या आहेत. कविता महाजन कवितेत पूर्णपणे जुडल्या आहेत. प्रत्येक अनुभवांचे बोल त्यांचे काव्य

अधिष्ठान आहे. म्हणून श्रीपाद भालचंद्र जोशीचं म्हणणं सार्थ वाटतं असं आपल्याला म्हणता येईल. जोशी म्हणतात, "लेखकाच्या 'स्व'चाच त्या भाग होत नसल्याने त्यांच्या निर्मितीद्वारे अभिव्यक्त होण्याच्या पातळीवर त्या पोहोचणे अशक्य झालेले असते."[२] म्हणजेच कवी, लेखकाचे अनुभव स्वनिष्ठ असायला हवे. ती पूर्तता महाजन यांच्या काव्यात आहे. या दृष्टीपासून आपण दूर जाऊ शकत नाही असा त्यांचा काव्य निर्धार आहे. जग आज धुळीनं माखलेलं त्यांना वाटतं जणू धुळच आज बोलते आहे. असा भास कवयित्रीला झाला आहे.

" कुठून येतोय सतत हा धुळीचा घूमसता आवाज
माझ्या घराची शांतता बाधवत?"

स्त्री दु:खाशी समरस, तिच्या वेदनेची सल महाजन ह्या जपतात.

"काहीच अर्थ राहिला नाही
माझ्या हातातील घागरीला !"

अशी ओळ तिचं लावण्य संपवताना दिसतं. स्त्रीच्या सर्वस्वाची जबाबदारी कवित्रीनी दाखवून दिलेली आहे. 'शेवटी हा एकुलता स्वरच' अशी आर्त हाक महाजन यांनी दिली आहे. कधी कधी मन मारून जगणं, तर कधी मनातील तवंगावर विश्वासात उतरणं ! मात्र दु:खांच्या विणीतून पहाणं कवयित्री चांगलं ओळखून आहे. प्रेमाचं बळ, प्रेमाचा निखळपणा यांच्या कवितेचं सामर्थ्य आहे. विश्वासाचं जग कवयित्रीने ओळखले आहे. बिनधास्तपणा त्यांनी मान्य केलेला आहे.

"तू येशील तू येशील
आणि तळहातावरील रेषांचे गुच्छ करून
मी तुझ्या हातात देईन."

प्रस्तुत ओळी, प्रेमाचं जग दाखवण्यात समर्थ ठरल्या आहेत.

"उबदार होत गेलं

जगण्यासाठीचे श्वास ही..." अशी प्रीतीची उत्तुंग भरारी महाजन यांच्या कवितेत आहे. धावत्या, गर्दीचं जग कवयित्रीला अस्वस्थ करत आहे. तरीपण प्रीतीच्या गंधात कवियत्री सुखावते. दु:खाचं आवरणाला पांघरून घालत आपल्या सुखाच्या शोधात नित्यमयता मांडणारी महाजन यांची कविता आहे. एकाकीपणा, स्त्री वेदना सांगताना स्पष्टपणे जाणवतो.

"मंग बंद होऊन गेलो आम्ही
हवाबंद काच घरात !"

प्रस्तुत ओळी प्रत्येक स्त्रीला लागणाऱ्या आहेत. काळानुसार बदलणारी परिस्थिती, त्या परिस्थितीमधील स्त्री मन, दबलेल्या भावना ओघ सारखा कवितेतून जाणवतो. 'जगणे मरणे कधी कुणाचे अवघड बनवु नये !' अशा महाजन यांच्या ओळी माणसांना माणूसपण शिकवून जातात.

"तो मोजू पाहतो अंतर
तिच्या मनापासून
आपल्या शरीरापर्यंतच !"

अशा ओळी मनाला खूप काही रुजवून जातात. माणसांच्या अंतरंगातील भेद खोलताना त्यांनी अशी सुचकता दर्शविली आहे 'ती न्याहाळत होती, निमुटपणे कुंडीत रुजून बसल्याप्रमाणे' अशी ओळ स्त्री वेदनाच स्पष्ट करते. सोबतच प्रत्येक कवितेमधून त्यांच्या विचारशीलतेचा आणि बुद्धीचा कस जाणवतो. डॉ. विद्याधर बनसोड म्हणतात त्याप्रमाणे, "मनुष्य हा विचार करणारा प्राणी आहे, तो बुद्धीवादी आहे"[३]

दु:खात घालवलेले क्षण निघून जातात, उरतात मात्र आठवणी

"अन्यथा दंश सोसून
काळंनिळं पडत जाणं
एवढाच होता पर्याय !"

हीच खरी ओळख वेदनेची कवयित्रीने 'धुळीचा आवाज' मधून पेरलेली आहे. दु:ख किती अमोघ आहे याची जाणीव महाजन यांनी करून दिली आहे. 'हाती उरते केवळ आपल्याला वगळले गेल्याचे दु:ख !

"बाई घाबरते
एकटंबिकटं राहण्याला
अंधाराला लख्ख झगझगीत
उजेडाला
अनोळखी व अनोळखी परिसराला !"
"लख्ख चमकले आईचे डोळे
माझ्यासाठीच्या
सगळ्या कडा विसरून"

वरील ओळी स्त्री जीवनच मांडतात. गरोदरपणातील वेदना, स्त्रीचे एकटेपण, त्यातून निर्माण होणारी भयता, दु:खता दिसते. दंगलीच्या काळात, मी धावले घाईने, खेळणी, खुर्च्या, निरवानिरव, एक रंगाचे नाव अशा सर्व कविता स्त्रीच्या दु:खात सामावलेल्या आहेत. लहान लहान उदाहरणाचा दाखला देत कवयित्री कविता महाजन स्त्री अंतरंग मांडण्यात यशस्वी ठरल्या आहेत.

**समारोप :**

'धुळीचा आवाज' मधील कवित्व हे स्त्री मनांचे कोडे उलगडणारे काव्य आहे. ज्यामध्ये कवयित्री स्वतःपासून सुरुवात करताना दिसतात. कवयित्री स्त्री असल्याने पुरुषपणाचा ठाव त्यांनी समर्पकपणे रेखाटलेला जाणवतो. प्रेमाची अनुभूती ते बालपण, उतारपण यामध्ये रेंगाळणारे स्त्री जीवन हे कवयित्रीचं भाव विश्व आहे. कवयित्रीनी मुक्तछंद शैलीत कवीतांची प्रभावी आणि आकर्षक मांडणी केल्याने त्यांची एक विशिष्ट शैलीची धाटणी कवितेमधून उमगली आहे. नव्या जगातील समर्थता काव्यात आहे. बिनधास्तपणा, तेजस्विता, ओजस्विता, आकर्षितता काव्यात ठासून भरल्याने कवितेला भारदस्तपणा प्राप्त झालेला आहे.

**निष्कर्ष :**

१. 'धुळीचा आवाज' मधील कवित्व स्त्री मनाला प्रेरणा देणारे ठरले आहे.
२. नव्या काव्यशैलीचा आवर्जून पणा सिद्ध होतो.
३. कविता मानवी मूल्यांना धरून आहे.
४. स्त्री प्रतिमांचा आरसा पुढे होताना, स्त्री जाणीव प्रखरतेने पुढे येते.
५. वास्तविकता कविता महाजन यांच्या काव्याचा प्राण आहे.
६. 'मुक्तछंद' हा प्रकार प्रभावीपणे काव्यातून भारदस्तपणाचा वाहवा ठेवून उभा झाला आहे,
७. कविता महाजन ह्या कवयित्रीची खास अशी ओळख काव्यातून उमटलेली जाणवते.

**संदर्भ :**

१. डॉ. यशवंत मनोहर, नवे साहित्यशास्त्र, विजय प्रकाशन, प्रथमावृत्ती सप्टे.२००१ पृ. क्र. १९
२. डॉ. विद्याधर बनसोड, 'तू', संवेदना प्रकाशन, प्रथमावृत्ती, १ जानेवारी २०१९, पृ. क्र. ७
३. डॉ. विद्याधर बनसोड., दलित साहित्याचे वैचारिक अधिष्ठान, संवेदना प्रकाशन, प्रथमावृत्ती, १३ नोव्हेंबर २०१८, पृ. क्र. ९